REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# "महाराष्ट्रातील आदिवासी समुदायाच्या समस्या"

कल्याणी दिलीप बच्छाव[१] , डॉ. शरद घोडके[२]
[१]टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
[२]पी.एच. डी. मार्गदर्शक.

**प्रस्तावना :-**



भारतीय समाजाच्या एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी समाजाची लोकसंख्यासुमारे ८८% आहे.हा समाज भारतातील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध धर्मीयापेक्षा वेगळा, स्वंतत्र असून आत्तापर्यत तो भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्त राहिला आहे.हा समाज मुख्यतः डोंगरी , जंगली प्रदेशातून पाण्याने वेठलेल्या बेटावरची खेडी, वाडया-वस्त्यांतून संपूर्ण भारतात विखुरलेला आहे. आदिवासी कोणास म्हणावे? याबाबत अभ्यासकांच्यात एकवाक्यता नाही.काही अभ्यासक त्यांना मूळ रहिवाशी म्हणतात जे एच. हटनसारखे मानवशास्त्रज्ञ त्यांना 'आदिम जमाती' म्हणतात भारतीय राज्यघटनेमध्ये त्यांना 'अनुसूचित जमाती' असा शब्दप्रयोग योजला आहे.

सद्यस्थितीत आदिवासींच्या समस्या हा विषय महत्त्वाचा वाटतो. आदिवासी समाजाच्या समस्या या अतिशय गुंतागुंतीच्या, क्लिष्ट आणि संकीर्ण आहेत. इंग्रजांच्या वसाहतवादामध्ये त्यांच्या समस्यांची बीजे आहेतकारण इंग्रजांनी आदिवासी समाजाकडे गांभीर्याने न पाहता दुर्लक्षचकेले. उदा.आसाममधीलकाहीक्षेत्रहे राखीव घोषित करुन तेथे ख्रिश्चन मिशनरीजशिवाय इतरेजनांना मज्जाव केलाहोता.

भारतावर परकीयांची आक्रमणे जेव्हाजेव्हा झाली तेव्हातेव्हा या आदिवासींनी भीतीपोटी दूर राना-वना-जंगलात आश्रय घेतला.जे प्राप्त परिस्थितीत आपल्याच ठिकाणी राहातहोते त्यांच्या जमिनी जमीनदार, सावकारांनी हाडपकेल्या. इंग्रजांनी आदिवासींना संरक्षण न देता सावकार, जमीनदारांनाचसंरक्षण दिले.

जसजशी विज्ञान- तंत्रज्ञानात प्रगतीहोतगेलीतसतशी आदिवासीं समाज आणि प्रगत पांढरपेंशीय समाज यांच्यातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक दरी रुंदावली. आदिवासी समाजाच्या परंपरागत जीवनपद्धतीतुन निर्माण झालेल्या समस्या एकीकडे आणि प्रगत पांढरपेशा समाजाच्या आंतरक्रिया-आदान- प्रदान क्रियेतूनसांस्कृतिकसरमिसळहोऊन निर्माण झालेल्या समस्या दुसरीकडे अशी एक विचित्र जीवनशैलीची निर्मितीहीच एक समस्या बनली.

## आदिवासी समाजाच्या समस्या

### अ). आरोग्यविषयक समस्या :-

१. कुपोषण
२. कुटुंबकल्याण विषयक
३. वैद्यकीय सोयी सुविधांचा अभाव
४. माता - बालमृत्यू प्रमाण

### ब) शैक्षणिक समस्या :-

१. साक्षरतेचेकमी प्रमाण
२. शिक्षकांची मानसिकता (जागृकता)
३. शिक्षणाबाबतची उदासिनता

४. माध्यमांचा प्रश्न

**क) आर्थीक समस्या :-**

१. वेठबिगारी पद्धत
२. दारिद्रय
३. शोषण
४. कर्जबाजारीपणा

**ड) सामाजिक समस्या :-**

१. अनिष्ठ प्रथा
२. व्यसनाधीनता
३. बोलीभाषेसंबंधीत समस्या
४. वेशभुषा व सांस्कृतीक परंपरांचा ऱ्हास

**वरील पैकीकाही निवडक समस्यांबाबत सविस्तर वर्णन पुढील प्रमाणेआदिवासी समाजाच्या समस्या**

**१. निरक्षरता :-**

एखादीगोष्टसमजून घेऊन लिहिल्या, वाचण्याची क्षमता म्हणजेसाक्षरता आणि साक्षरतेची एक ढोबळ व्याख्या केली जाते.अर्थातच या क्षमता ज्यांच्याजवळ नाहीतो निरक्षरहोय. आदिवासी समाजात सर्वच जमीतींना भाषा (language) नाही. अनेक जमातींची स्वत:ची बोली (dialect) असते. भाषेला लिपी असते.बोलीला नसते.उदा.मराठी, हिंदी भाषा आहे.कैकाडी, नंदीवाले, वडार यांची बोली आहे.बोली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडेसंक्रमित होते.लिपीच नाहीतर शिकवणार कसे नि काय?मुळात एखाद्या जमातीची लोकसंख्या एखाद्या पाडया- वाडीपुरती मर्यादित असते.त्यांच्यासाठी शाळाकशीकाढणार?काढलीतर त्यांच्याच बोलीत शिकविणारे शिक्षककुठून आणणार?जेथेगोंडीसारखी बोलीभाषा आहेतेथेसुद्धा शिकविणाऱ्या शिक्षकांची अनुपलब्धता आणि भाषेचा माध्यमाचा प्रश्न आहेच. प्रगत - पुढारलेल्या समाजातील शिक्षक'स'.समचा शिकविणार, आदिवासी विद्यार्थ्याला 'स' सशाचा शिकवावा लागेल. इंग्रजी शिक्षणाने पुर्णसाक्षरता आली नाही.दुसरीकडे मातृभाषा - बोलीचा त्याग त्यातून निरक्षरतातशीच राहिली.आसाम, प. बंगाल, नागालॅंड येथील जागा, खासी, पलियन, ईरुला, अडिसी इ.जमीतींतीलकाही कुंटुंबे निरक्षर राहिली किंवा अल्पशिक्षित झाली.

आदिवासींच्या शिक्षणासाठी शासनाने वस्तीशाळा, आश्रमशाळा, माफत गणवेश, मधल्या सुट्टीत भोजन, मुलींना उपस्थिती भत्ता इ. पुरवूनही अपेक्षित शिक्षणप्रसार झाला असे म्हणता येणार नाही. भटकंती, मजुरी, वेठबिगारी, हमाली, बांधकाम मजुरी, घरगडी , शेतमजुर, गुराढोरांमागे फिरणे यातून पोटाची भ्रांत असताना शाळेत जाऊनकाय साध्य होणारहाच विचार प्रबळ ठरतो. विशेषत: भटकंती, स्थलांतरामुळे एकाच ठिकाणी राहणे अशक्य असल्यानेते आसाम, मिझोराम, झारखंड, त्रिपुरा, नागालॅंड, उत्तराखंडमधील आदिवासी शिक्षणापासून वंनित राहिले आहेत.

**२. दारिद्रय :-**

अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूतगरजांची पूर्तताकरण्याचीक्षमता नसणे म्हणजे दारिद्रयहोय. अशी दारिद्रयांची व्याख्या करतात.ज्या समाजामध्येसदस्यांच्या जीवन निर्वाहविषयक किमान आवश्यकगरजा भागविण्याचीही परिस्थिती नसतेतो समाज दारिद्रययुक्त समाज म्हटला पाहिजे.अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजा म्हटले जात असलेतरी पाणी, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन याहीगरजांचा त्यात समावेश असतो असला पाहिजेहेही ध्यानात घ्यावे.

आदिवासींच्या आर्थिक क्रियांमध्ये आपण असे पाहिलेकी आदिवासी समाजात बहुसंख्य लोकहे अन्न - संकलन, शिकार, मासेमारी, बदलती कुऱ्हाड शेती, हस्तव्यवसाय, मोल-मजुंरी अशा संमिश्र आर्थिक क्रियाकरतात. काही मोजक्याच या सगळया आर्थिक क्रिया बारमाही चालू असल्या तरी उदरनिर्वाहापुरतेच उत्पन्न मिळण्याची पद्धत असल्याने साठेबाजी, नफेखोरीला वाव नाही.आज मिळाले पुरे. उद्याचे उद्या. हीच जीवनशैली जंगलतोड प्रतिबंध कायदा, वन्यजीव संरक्षणकायदा यांसारख्याकायद्यांमुळे जळणासाठी लाकूडफाटातोडणे, पोटासाठी शिकारकरणे यावर मर्यादा आल्याने आपल्याच वाडवडिलांच्या भूमीत जंगलाचे राजेगुन्हेगार ठरु लागले. जंगलव्याप्त नागालॅंड, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मणीपूर, आसाम, उत्तरप्रदेश, झारखंड, ओरिसा, आंध्रप्रदेश, उत्तराखंड, महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, मेळघाट, कोकण किनारपट्टीतील आदिवासी समाजात हे जाणवते. वन कर्मचाऱ्यांनी आदिवासींची हत्यारे जप्त करुन त्यांच्यावर कारवाई करण्याने आदिवासी समाज भयप्रद दारिद्रयात जगत आहे.

**३. कुपोषण :-**

नंदुरबार जिल्हयातकुपोषणाची समस्या पूर्वीसारखी गंभीर नसलीतरी कुपोषणबाबतत अपेक्षित ध्येयगाठू शकलो आहोत असे म्हणता येणार नाही. उदरनिर्वाहासाठी आई - वडील दोन्हीकामकरतातत्यामुळे मुलांकडे लक्ष देता येत नाही. तसेच रोजबारासाठी स्थलांतर करावे लागतो, मजुरीसाठी बाहेरगावी जावे लागते, प्रत्येक वेळी मुलांना सोबत घेऊन जाता येत नाही.त्यातुळे देखील मुलांकडे दुर्लक्षहोतो.लसीकरणाबाबत लोकांमध्ये अजूनही जागृकता निर्माण नाही.

## ४. कर्जबाजारीपणा :-

आदिवासींच्या बहुतेक सर्व समस्या या परस्परव्यापी आहेत. मुळातील असलेल्या दारिद्रयावर उपाय म्हणूनकर्जकाढणे - शेती - व्यवसायातून अपेक्षित उत्पन्न न मिळणे, परिणामीकर्जफेड न होणे यातून महाराष्ट्रात अनेक शेतकरी आत्महत्याकरीत असल्याच्या घटना समाजपटलावर दृश्यमान होत आहेत. जंगलच्या राजांना परंपरागत जंगलावरील हक्कांपासून वंचित करण्यात आले.जंगले आणि खाणीठेकेदारांच्याकडेगेल्या.आपल्याच भूमीत आदिवासी उपरे झाले.ठेकेदार- सावकारांनी आदिवासी पिढयानुपिढयाकर्जातच राहतील अशी व्यवस्था केली. सावकारांच्या, जमीनदारांच्या ताब्यात गेलेल्या आपल्याच शेतावर मजुरीकरण्याची वेळ त्यांच्यावर आली. भरीस भर म्हणूनस्त्री- पुरुषांच्यात मद्यपानाचे व्यसन, कुपोषण, अनारोग्य , निरक्षरता, आर्थिक शोषण या सगळयांमुळे आदिवासींच्या पिढयाकर्जाच्या ओझ्याखाली राबल्या बेल्या.

## ५. जमिनीचे हस्तातरण :-

दुसऱ्यांच्या हाती देणे, स्नेहतोडणे, परकीय भाव असेत्याचे मराठीत अर्थ आहेत.काल मार्क्स यांनी मालककामगार यांच्या संघर्षाच्या संदर्भात alienation हीसंकल्पना योजली असून त्याला समाजशास्त्रीय परिभाषेत अलगता किंवा परात्मता असे म्हणतात. येथे मात्र आदिवासी समाजाच्या समस्यांच्या संदर्भात Alienation of Land म्हणजे जमिनीची विल्हेवाट जमिनीचेहस्तांतरण या अर्थानेही संज्ञा योजली आहे.

आदिवासी हे येथलेभूमीपुत्र आहेत.गोंड, बैगा, संथाल, नागा, ठाकूर, वारली, कादर, पलियन, चेंचू, भिल्ल वगैरे आदिवासी पिढयानपिढया,मुक्तपणे या जमातींचा वापर अर्थोत्पादनासाठीकरीत आल्या आहेत. आदिवासींनी या जमिनीखरेदीकेल्या नाहीत.हे वास्तव आहे.पण या जमिनीगेली शेकडो वर्षे त्यांच्याच ताब्यात असूनते जमिनीतूनकष्टकरीत आहेतहेही वास्तव आहे.याच कारणासाठी त्यांचा जमिनीवर हक्क आहे अशीत्यांची भावना आहे.

पण जंगले व वन्यप्राण्यांना अभय देण्यासाठी इंग्रजांनीThe National Forest Policy, १८५२ द्वारे आदिवासींच्या शिकार, जंगलतोड, शेतीवर नियंत्रण आणि निबंध लादून आदिवासींना भूमिहीन करण्याची नांदीचकेली. आदिवासींच्या जमिनीचेहस्तांतरणकरण्यासाठीखालील तंत्र, युक्त्यांचा अवलंब केला गेला.

१. भूमापन कार्यालयात आदिवासींच्या नावे जमीन असल्याची नोंद नाही. ते शेतीकरीत असलेली जमीन त्यांच्या मालकीची आहे अशीकागदोपत्री नोंद भूमापन कार्यालयात नसल्यानेकायद्याचा दबाव आणून त्यांना भूमिहीन केले.
२. जंगलातल्या मोठया जमिनी बेनामी मालमत्ता आहेत. या जमिनी बेकायदेशीरपणे बेनामी व्यक्तींच्या नावे असल्याचे दाखवून त्या आदिवासींकडून काढून घेतल्या गेल्या.
३. ज्या आदिवासींच्या मालकीच्या जमिनीहोत्या त्यांना कुठल्यातरी आर्थिकसंकटांमुळे त्या जमिनी सावकारांकडे गहाण ठेवून कर्ज काढावे लागले. कर्जावर अधिक व्याजदर, परतफेडी मार्ग नाही. अज्ञानी याचा गैरफायदा घेऊन सावकार व महाजनांनी त्यांच्या जमिनी गिळकृतकेल्या.
४. काही जमिनी आदिवासींच्या मालकीच्या होत्या पण ठेकेदारोनी जबरदस्तीने त्याच्या जमीनहद्दीत अतिक्रमणकेले. खोटीकागदपत्रे बनवून, जमिनींच्या सिमारेषेच्या मोजमापात लबाडी करुन, तलाठी , पटवारी, भू-मापन अधिकारी यांना लाच देऊनकायद्याच्या चौकटीत बसून आदिमांच्या जमिनी बळकावल्या.
५. आदिवासींच्या वैवाहिक संबंधातून सुद्धा जमिनीवरील हक्क गमावावे लागले. विवाहामुळे जमिनीची वाटणी / विभाजन होणे किंवा विवाहबाह्य संबंध, अनैतिकता यातून कित्येकांना जमिनीला मुकावे लागले.
६. आदिवासींनी बिगर आदिवासी मुलाला दत्तक घेणे व नंतर त्या दत्तक पुत्राच्या नावे जमीनकरणे यामुळे जमिनी बिगर आदिवासींच्या घशात गेल्या. वरील सर्व प्रकारच्या युक्त्या वापरुन आदिवासींच्या जमिनी सावकार, जमीनदार, बिन आदिवासी, दत्तपुत्र यांनीकाढून घेतले.

## संदर्भ :-

१. गुरुनाथ नागगोंडे, भारतीय आदीवासी, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे २०१२
२. गोविंद गारे, आदिवासींचे प्रश्न, आदिम प्रकाशन, पुणे, १९७५

३. डॉ. माणिक माने/ डॉ. ए, ए. गढवाल आदिवासीचे समाजशास्त्र, विदया प्रकाशन, नागपुर, २०१२
४. संपुर्ण समाज कल्याण अधिकारी, केसागर पब्लिकेशन, पुणे २०१२
५. संगवे विलास, आदिवासीचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७८
६. Bose N. K, cast and scheduled Tribals in india (Aria Publishing House)
७. Dr, Gharye G, S, the scheduled Tribes, popular publishing, Mumbai
८. WWW. tribal problems. in
९. WWW. tribal integration . in
१०. WWW. tribal welfare. in